या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
94036 41482

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | गुरुवार २५ एप्रिल २०२४ | अंक१३६ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती बिघडली, छत्रपती संभाजीनगरच्या रुग्णालयात दाखल

महाराष्ट्रात सध्या उन्हाचा कडाका प्रचंड वाढला आहे. एकीकडे लोकसभा निवडणुकांमुळे राजकारण तापत आहे. विविध पक्षाचे नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांची भर उन्हात प्रचारसभा होत आहे. भर उन्हात रॅली निघत आहे. तर दुसरीकडे उन्हाचा कडाकादेखील तितकाच भयंकर बघायला मिळतोय. या उन्हाच्या कडाक्यामुळे अनेकांना उष्माघाताचा त्रास होतोय. काही दिवसांपूर्वी ठाकरे गटाचे आमदार कैलास पाटील यांना प्रचारसभेत चक्कर आल्याची घटना घडली होती. त्यानंतर यवतमाळमध्ये आज केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना भोवळ आली. यानंतर आता



मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती बिघडल्याची माहिती समोर येत आहे. त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. मराठा नेते मनोज जरांगे पाटील हे विविध राज्यांचा दौरा करत आहेत. जरांगे पाटील मराठा आरक्षणासाठी सभा घेत आहेत. त्यांनी याआधी कित्येक दिवस उपोषण केलं आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळे महाराष्ट्रात मराठा समाजाला आरक्षणाचा कायदा लागू झाला आहे. पण तरीही मनोज जरांगे पाटील सगे-सोयरेच्या मुद्द्यावर ठाम आहेत. मनोज जरांगे महाराष्ट्रात ठिकठिकाणी जावून मराठा समाजाच्या नागरिकांना आवाहन करत आहेत. त्यांच्यासमोर आपली भूमिका मांडत आहेत. या दरम्यान बीडच्या दौऱ्यादरम्यान त्यांची प्रकृती बिघडल्याची माहिती मिळत आहे.

### जरांगेंपाटलावर छत्रपती संभाजीनगरच्या रुग्णालयात उपचार

'मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती बिघडली आहे. मनोज जरांगे पाटील यांना छत्रपती संभाजीनगरच्या गॅलक्सी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. मनोज जरांगे पाटील बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते. या दौऱ्यादरम्यान अचानक त्यांची प्रकृती बिघडली आहे. त्यांना आता छत्रपती संभाजीनगरच्या गॅलक्सी रुग्णालयात आणण्यात आलं आहे. त्यांच्यावर आता उपचार सुरु आहेत.

# बेरोजगारांसाठी येडेश्वरी सारखे आणखी युनिट उभे करू, त्यासाठी बजरंग बाप्पांना संसदेत पाठवा- सौरव सोनवणे



**केज( प्रतिनिधी)**

केज:सुशिक्षित बेरोजगारांच्या हाताला काम उपलब्ध करून देण्यासाठी येडेश्वरी साखर कारखान्यासारखे इतर युनिट उभे करू. बेरोजगारांना स्वतःच्या पायावर उभे करू. त्यासाठी शेतकरी पुत्र बजरंग बाप्पा सोनवणे यांना मतदानरूपी आशीर्वाद देऊन संसदेत पाठवा. आवाहन युवानेते सौरव बजरंग सोनवणे यांनी केले. आम्ही आपले कधी ही विसरणार नाहीत अशी ग्वाही ही त्यांनी दिली. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्या प्रचारार्थ केज तालुक्यातील लव्हुरी, कोल्हेवाडी, तरनळी, साबला, धर्माळा या गावात कॉर्नर बैठका घेण्यात आल्या. यावेळी युवानेते सौरव सोनवणे हे बोलत होते. यावेळी शेकापचे भाई मोहन गुंड, मुन्ना चाळक, पिंटु मस्के, बप्पा डोंगरे बालाजी सोनवणे यांच्यासह तालुक्यातील प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी भाई मोहन गुंड म्हणाले की, या निवडणुकीत सर्वसामान्य शेतकरी, कष्टकरी वर्गामध्ये भाजपविरोधी खूप मोठा रोष निर्माण झाला आहे. गेल्या दहा वर्षापासून फक्त भांडवलदार पोसण्याचे काम या भाजपकडून होताना दिसत आहे. मात्र सर्वसामान्य शेतकरी, कष्टकरी वर्गाला वेठीस धरले आहे. पीकविमा, अतिवृष्टी अनुदान, फळबागाचे नुकसान अशा अनेक प्रश्नावर भाजप उदासीन आहे. बीड जिल्ह्यात सर्वाधिक आत्महत्या झाल्या असून बीडच्या खासदाराने दहा वर्षात चक्र शब्द काढला नाही. असा आरोप करीत इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांची निवडणूक सर्वसामान्य माणसाने हाती घेतली असून त्यांचा विजय कोणी रोखू शकत नाही. असा विश्वास भाई मोहन गुंड यांनी व्यक्त केला.

# ८ ते ११ मे या कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन




राजापूर:- (प्रमोद तरळ) तालुक्यातील ओणी येथील सुप्रभा वाचनालय, कोंडिवळे, सुप्रभा पतसंस्था, ओणी पंचक्रोशी शिक्षण मंडळ आदी संस्थांची आधारवड बनलेली सर्वोत्कर्ष सामाजिक संस्था ही १९८० स्थापन झाली आहे या संस्थेच्या वतीने दि. ८ मे ते ११ मे २०२४ या कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे

बुधवार दि ८ व गुरुवार दि. ९ मे रोजी ओव्हरआर्म क्रिकेट स्पर्धा, शनिवार दि ११ मे २०२४ रोजी स. ११ वा. श्री सत्यनारायणाची महापूजा, दु. ३.३० हळदीकुंकू समारंभ, रात्री ८.३० माहेरवाशिणी व मान्यवरांचा सन्मान सोहळा, रात्री ९ वा. जिल्हास्तरीय सोलो व ग्रुप डान्स स्पर्धा आदी कार्यक्रम होणार आहेत सदर कार्यक्रम कै. बाबू गोविंद तुळसणकर सभागृह, कोंडिवळे कासारवाडी येथे संपन्न होणार आहेत

सोलो व ग्रुप डान्स स्पर्धेतील सहभागासाठी सुनील जाधव - ८९८३०६५०७८, विनोद मिरगुले - ८६६८८१०१७७, गणपत भारती - ८८७९६९०००४ तर क्रिकेट स्पर्धेतील नोंदणीसाठी अक्षय जानस्कर - ९०८२७६३९९५, प्रसाद मयेकर - ९०२८७७२९१९, गणपत भारती - ८८७९६९०००४ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे

# राष्ट्रपिता महात्मा जोतीराव फुले याच्या विठंबनेच्या निषेधार्थ सकल ओ बी सी समाजाच्या वतिन माजलगावात तहसिलदार यांना निवेदन

**माजलगाव प्रतिनिधी**

राष्ट्रपिता महात्मा जोतीराव फुले यांच्या पुतुळयावर शाही फेकुन दिनांक २३एप्रिल २०२४ रोजी विठंबना केल्याची घटना यवतमाळ येथिल महात्मा चौक येथे घडली फुले या घटनेच्या निषेधार्थ विठंबना करणा-या नराधमावर शासना मार्फत कठोर कार्यवाही करण्यात यावी या साठी माजलगाव तहसिल तहसिलदार मनाळे मॅडम यांना सकल ओबीसी समाजाच्या वतिन निवेदन देण्यात आले या प्रसंगी ज्ञानेश्वर नाना मेंडके,ग्यानबा सरवदे, अमोलउपस्थित एकता परिषदेचे जिल्हा अध्यक्ष ज्ञानेश्वर कोरडे,ग्यानबा सरवदे, अमोल जाधव,शंकर गावडे, अविनाश कांडुरे,डॉ भागवत साळवे,दत्ता आबुज ,पवन कोरडे, नितिन कोरडे जिवन कोरडे ,रामभाऊ गिरगुणे, ज्ञानेश्वर गिरगुणे,भिमराव हिवाळे व ओबीसी कार्यकर्ते उपस्थित होते



# बीड लोकसभा निवडणुकीसाठी भाजपा महायुतीच्या उमेदवार म्हणून उमेदवारी बुधवारी पंकजा मुंडे यांनी चार उमेदवारी अर्ज दाखल केले.

**बीड (प्रतिनिधीदि.**

बीड लोकसभा निवडणुकीसाठी भाजपा महायुतीच्या उमेदवार म्हणून उमेदवारी बुधवारी पंकजा मुंडे यांनी चार उमेदवारी अर्ज दाखल केले. यानंतर शहरातून फेरी काढण्यात आली. सायंकाळी झालेल्या सभेत पंकजा मुंडे यांनी असे आवाहन केले 'मला पैसे कामवायचे नाहीत, नावाची, प्रसिद्धीची लालसा नाही. एक काटा माझ्या मनात रुतलेला आहे. गोपीनाथ मुंडेंचे स्वप्न माझ्या डोळ्यात आहेत. ते पूर्ण करण्याची अशी संधी पुन्हा येणार नाही. दहा वर्षांपूर्वी मला गोपीनाथ मुंडेंना हार घालायचा होता, अंत्यसंस्कार करावा लागला. ती सल दूर करण्यासाठी ही शेवटची संधी मला द्या.', असे भावनिक आवाहन भाजपच्या राष्ट्रीय सचिव तथा बीड लोकसभा मतदारसंघातील भाजपाच्या उमेदवार पंकजा मुंडेंनी केले . यावेळी बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे , उमेदवार पंकजा मुंडे, खासदार डॉ. प्रीतम मुंडे यांच्यासह आमदार सुरेश धस, आम नमिता मुंदडा, आमदार लक्ष्मण पवार, आमदार प्रकाश सोळंके, आमदार बाळासाहेब आजबे, अमरसिंह पंडित, रमेश आडसकरआदींची उपस्थिती होती. पंकजा मुंडे म्हणाल्या , 'या जिल्ह्याला कारस्थानाची सवय आहे. कोणी कारस्थाने करू नका. आपल्या विकासावर कोणतेही काळेढग येऊ देऊ नका . मी पराभव पचवलाय . हा पराभव माझा नव्हता तर जनतेचा होता. त्यामुळे माझी प्रत्येकावर बारीक नजर आहे. आता मी पदर पसरून म्हणतेय, एक काटा माझ्या मनात रुतलेला आहे. दहा वर्षांपूर्वी चार तारखेला मला गोपीनाथ मुंडेंना हार घालायचा होता, अंत्यसंस्कार करावा लागला. ती सल दूर करण्यासाठी ही शेवटची संधी मला द्या गोपीनाथ मुंडेंचे स्वप्न माझ्या डोळ्यात आहेत. ते पूर्ण करण्याची अशी संधी पुन्हा येणार नाही. मला माझ्यासाठी नाही, तर जनतेसाठी पद हवे आहे.' भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान दिले. त्यांनी संविधानातून हक्क दिले. संविधान बदलण्याचा अधिकार जगात कोणालाच नाही. जर कोणी संविधानाला नख लावायचा प्रयत्न केला तर आपण तुमच्या आधी रस्त्यावर उतरू, असा इशाराही पंकजा मुंडे यांनी या आधीच्या भाषणातून दिलेला आहे.



संपादकीय

# संस्कृती संवर्धन

आपल्या कुटुंबाचा सर्वांगीण विकास होऊन आपली मुले,नातवंडे सुसंस्कारक्षम,आदर्श सुखी व राष्ट्रभक्त व्हावेत म्हणून वर्षाचे सर्व उत्सव, परंपरा,राष्ट्रीय सण विश्वातील सर्व धर्म व पूजा, प्रार्थना यांचा मिलाफ आपण साधत असतो. आपल्या उत्सवांच्या वेळेस ज्या परंपरा आपण पाळतो, निभावतो त्यातून आपली संस्कृती संवर्धन होत असते.सुसंस्कार,सदविचार,सुसंवाद,समृद्धी व समाधान मिळत असते.भारतात, सणाची प्रतीक्षा सर्व वयोगटातील लोक म्हणजेच मुले, तरुण आणि कुटुंबातील सर्वच वडिलधारे करतात. भारतातील प्रत्येक व्यक्ती भारतीय उत्सव खूप उत्साहाने आणि आनंदाने साजरे करतात. दिवाळी, होळी, रक्षाबंधन, गणेश चतुर्थी, दुर्गा पूजा, दसरा, स्वातंत्र्यदिन आणि प्रजासत्ताक दिन हे काही महत्त्वाचे धार्मिक आणि राष्ट्रीय सण आहेत.

भारतीय सण हे भारतीय संस्कृतीचे प्रतीक आहेत. एकीकडे दसरा अन्याय केल्याबद्दल न्यायाची घोषणा करतो तर दुसरीकडे दिवाळी असे सांगते की आम्ही अंधकाराचे नव्हे तर प्रकाशाचे पुजारी आहोत. होळी हा नृत्य आणि संगीत, रंग यांचा सण आहे. रक्षाबंधन भावंडांमधील निःस्वार्थ आणि पवित्र प्रेम यांचा गौरव करतो. मकरसंक्रांतीद्वारे सूर्याचे स्वागत केले जाते. महाशिवरात्री, श्रीराम नवमी, गणेश चतुर्थी इत्यादी उत्सवातही आपली संस्कृती तिच्या भव्य आणि वेगवेगळ्या रूपात प्रतिबिंबित होते.

आपले सण आनंद आणि करमणुकीचे साधन आहेत. लोकांना उत्सवांमधून ताजेपणा, आनंद आणि प्रेरणा मिळते. धार्मिक सणांनी मन प्रसन्न आणि निर्मळ होऊन जाते. सण जातीयता आणि प्रांतीयतेच्या भिंती पाडून टाकतात. ते आपल्या हृदयात सहकार्य आणि बंधुत्व निर्माण करतात. यातून आपल्याला अन्याय आणि अत्याचारांवर लढा देऊन देशात न्याय आणि शांतता प्रस्थापित करण्याची प्रेरणा मिळते, त्याग आणि तपश्चर्येद्वारे आयुष्य आनंदी करण्याचा सुवर्ण संदेश मिळतो.

दु:खाची बाब म्हणजे आजकाल काही लोक सणांचे पावित्र्य विसरून, जुगार खेळतात, मद्यपान करतात आणि गैरवर्तन करतात. ते पैसे वाया घालवतात आणि कधीकधी छोट्या छोट्या गोष्टीवर हाथापाई करतात. कोणत्याही परिस्थितीत उत्सवाचा आनंद विलासितेचे पोषक होऊ नये. सण हे आपल्या आयुष्याचे महत्वाचे भाग आहेत, म्हणून आपण सणांचे महत्त्व समजून घेतले पाहिजे आणि त्यांच्याशी संबंधित आपण निर्माण केलेल्या वाईट गोष्टींचा त्याग केला पाहिजे.

सौ जयश्री पंकज बोरसे,कल्याण

# अर्धवट उपचार: पुढे धोक्याचा सुमार!

**(विश्व मलेरिया डे सप्ताह विशेष.)**

धक्कादायक असे की, मलेरिया- हिवताप आजाराच्या उच्चाटनासाठी २५ एप्रिल या दिवशी भलेही जागतिक मलेरिया दिन साजरा होतो. मात्र वास्तव असे की, जगभरात प्रत्येक दोन मिनिटांना एका बाळाचा अथवा लहान मुलाचा मृत्यू केवळ मलेरियाने होतो. ही जागतिक पातळीवरील सरासरी आहे. मलेरिया हा डासांच्या चावण्यामुळे होणारा रोग आहे. डासांद्वारे त्याचा प्रसार होतो. याचा प्रादुर्भाव विषुववृत्तीय भागांत जास्त आहे. आपण डॉक्टर नाही, तरी सतर्कतेसाठी हे ठावे असावे. मलेरियाचे गांभीर्य लक्षात घेता जागतिक मलेरिया दिन पाळण्याची निकड भासू लागली. अधिक माहितीसाठी वाचा हा श्री एन. के. कुमार गुरूजी यांचा लेख... संपादक.

मलेरियाला समूळ संपवण्यासाठी डब्ल्यूएचओ व आरबीएम एकत्र आले आहेत. त्याच्या समूळ उच्चाटनासाठी राजकीय, सामाजिक पातळीवर एकत्र येणे, विशिष्ट अजेंडा तयार करणे अशी त्यांची संकल्पना आहे. प्रोटोजुअन प्लाज्मोडियम नावाच्या कीटाणूच्या एनोफिलीज मादी डासापासून मलेरिया होतो. आजवर या आजाराने जगभरात अनेकांचे बळी घेतले आहेत. या आजाराचे समूळ उच्चाटन करण्यासाठी प्रयत्न सुरु असतानाच अवघे जग आज कोरोना व्हायरस अर्थातच कोव्हिड-१९ या विषाणूचा सामना करत आहे. जागतिक आरोग्य संघटना डब्ल्यूएचओने या विषाणूचे वर्णन साथिचा आजार असे केले आहे. दरम्यान जागतिक आरोग्य संघटनेने मलेरिया आणि इतर साथींच्या आजारांचा अनुभव लक्षात घेता जगभरातील देशांनी कोरोनाचे संकट लवकरात लवकर कसे निपटता येईल, यासाठी महत्त्वपूर्ण पावले उचलावीत. महत्त्वाचे असे, की आज जागतिक मलेरिया दिन आहे. प्लाझमोडियम या जातीच्या डासांमुळे होणारा हा रोग तसा फार प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. ख्रिस्तपूर्व पांचव्या शतकात हिपोक्रॅटिस यांना मलेरिया सदृश्य आजार माहीत होता. सतराव्या शतकाच्या पूर्वार्धात जैलुइट लोकांनी पेरू देशात सिंकोना ही वनस्पती आणली होती. या सुमारास जेव्हा युरोपमध्ये फार मोठ्या प्रमाणात मलेरियाची साथ आली. तेव्हा या सिंकोना वनस्पतीचा त्या तापावर उपचार करण्यात आला होता. या उपचारांमुळे मलेरिया आणि अन्य प्रकारचे ताप यांतील फरक सिडनर्हेम आणि अन्य वैद्यांना ओळखणे शक्य झाले. इ.स. १८८०मध्ये लेव्हेरान यांनी मलेरिया निर्माण करणाऱ्या डासांचा शोध लावला, परंतु या डासांचे प्रामुख्याने जे तीन प्रकार आहेत, त्याचा शोध त्यावेळी लागला नव्हता.

जागतिक मलेरिया दिन हा २५ एप्रिल रोजी जगभर साजरा केला जातो. इ.स.२००८मध्ये अफ्रिकेत हा दिवस पहिल्यांदा साजरा करण्यात आला. मलेरिया या साथीच्या आजाराने आजवर जगभरात अनेकांचा बळी घेतला आहे. त्यामुळे अवघ्या जगाने एकत्र येत मलेरिया आजाराचे संपूर्ण उच्चाटन करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे जागतिक मलेरिया दिन साजरा केला जातो. सन २००७ या वर्षाच्या मे महिन्यात भरलेल्या साठव्या जागतिक आरोग्य परिषदेत हा दिवस साजरा करण्याची घोषणा करण्यात आली. या परिषदेला उपस्थित असलेल्या ४४ देशांनी एकमुखाने ही घोषणा केली. जागतिक आरोग्य संघटनेने दिलेल्या आकडेवारीनुसार सन २००० ते २००४ या कालावधीत मलेरियामुळे होणाऱ्या मृत्यूच्या प्रमाणात मोठी घट झालेली दिसते. या काळात मृत्यूदर सुमारे ४० टक्क्यांनी घसरला आहे. ही आनंदाची बाब आहे. जागतिक आरोग्य संघटनेचा २०१९चा अहवाल सांगतो, की सन २०१४ ते २०१८या काळात मात्र मलेरियाचा प्रादुर्भाव कमी करण्यात जागतिक पातळीवर विशेष यश आले नाही. साधारण सन २०१७मध्ये मलेरियाने जेवढे मृत्यू झाले तेवढेच २०१८मध्येही झाले. त्यामुळे मलेरिया उच्चाटनाचे महत्त्व अधिक वाढले आहे. हा डास मलेरियाचा वाहक आहे. या डासांचे नियंत्रण हा मलेरिया रोखण्याचा परिणामकारक उपाय आहे. इ.स.१८९४ साली रॉस यांनी या संदर्भात पुढील संशोधन करण्याचे ठरविले. त्यांनी, ज्या रोग्यांना मलेरिया झाला आहे. त्यांना चावा घेण्यास डासांना उद्युक्त केले. या मलेरिया ग्रस्त रोग्यांना डास चावल्यावर, त्या डासांच्या शरीरात मलेरियाच्या जंतूंचे काय होते? कोणकोणते आणि कसे बदल होतात? याचा अभ्यास सुरू केला; परंतु पहिली दोन वर्षे त्यांत फारशी प्रगती झाली नाही, तरीही नाउमेद न होता त्यांनी अभ्यास चालूच ठेवला होता. इ.स. १८९७मध्ये त्यांच्या प्रयत्नांना यश आले. त्यांना दिसून आले की, डासांच्या जठरामध्ये बटणाच्या आकाराच्या जंतूंची अनेक अंडी तयार होतात. ही अंडी त्या डासांच्या लाळेत येतात आणि असे डास जेव्हा माणसांना चावतात तेव्हा त्या माणसांमध्ये पुरेशी प्रतिकारशक्ति नसेल त्यांना मलेरिया होतो. हे त्यांचे संशोधन बहुमोलाचेच होते.

इ.स.१८९४मध्ये मॅनसन यांनी असे गृहीतक मांडले, की मलेरिया हा रोग डासांमुळे होत असून तो या जंतूंनी युक्त डास चावा घेऊनच नव्हे, तर पाण्यावाटे पसरवीत असावेत. पुढे इ.स. १८९८मध्ये रॉस यांनी मलेरिया डासांमुळे नेमका कसा होतो, याचा शोध लावला. पक्ष्यांमधील मलेरिया प्रमाणेच मानवी शरीरांतही घडामोडी होत असल्या पाहिजेत, असे त्यांना दिसून आले. त्याच वर्षी ग्रासी, बिगनमी आणि बास्टिनेली यांनी ॲनोफेलिस जातीच्या डांसामध्ये प्लाझमोडियम, फाल्सिपॅरम या जातीच्या मलेरियाच्या जंतूंची कशी वाढ होते आणि पुढे ते संसर्गित डास चावल्यामुळे माणसांमध्ये मलेरिया कसा होतो, हे दाखवून दिले. मलेरिया तापात थंडी वाजून ताप येणे आणि पुन्हा तीन चार दिवसांनी ताप येण्यामुळे शरीरात हिमोझाईन हा विषारी पदार्थ दिसून येतो. यामध्ये दोन प्रमुख- १) मलेरियाचे जंतू आणि त्यांचे वातावरण आणि २) ॲनॉफिलस जातीचे डास आणि त्यांचे वातावरण या घटकांचा विचार केला पाहिजे.

**श्री एन. के. कुमार, गुरूजी.**
**(मराठी साहित्यिक विदर्भ**

# कवयित्री सौ.राणी धनवे यांना वसुंधरा सोशल फौंडेशनच्या वतीने सामाजिक आणि साहित्यिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल वसुंधरा गौरव पुरस्कार

वसुंधरा सोशल फौंडेशनच्या वतीने ज्येष्ठ पत्रकार भरतकुमार मोरे, उर्दू – मराठीचे ज्येष्ठ साहित्यिक अय्युब नल्लामंदु, लेखक व व्यंगचित्रकार सतीश वैद्य, अशोक दिलपाक, राजेंद्रकुमार निकाळजे, प्रविण तळे, व मंगळवेढा, सोलापूर येथील प्रसिद्ध कवयित्री सौ. राणी वसंत धनवे, तसेच पुणे येथील कवी साहित्यिक, निवेदक ॲड. उमाकांत आदमाने, सोलापूर विकास मंच या संघटनेस ज्येष्ठ पत्रकार प्रशांत माने, पंजाब नैशनल बँकेचे माजी मॅनेजर हेमंत वैद्य, शगुफ्ता दंडोती, योगीन गुजर यांच्या हस्ते प्रसिद्ध कवयित्री सौ. राणी वसंत धनवे यांच्या सामाजिक, साहित्यिक क्षेत्रातील काम पाहता त्यांना वसुंधरा सोशल फौंडेशन संस्थेतर्फे संस्थेचे संस्थापक आय.आय. फराश यांच्या हस्ते पुणेरी पगडी पुष्पगुच्छ, स्मृतिचिन्ह, देऊन मोठ्या उत्साहाने "वसुंधरा गौरव पुरस्कार" २०२४ सोलापूर येथे प्रदान करण्यात आला.

सौ. राणी वसंत धनवे ह्या मंगळवेढा, सोलापूर येथील बळीराजा को ऑपरेटीव संस्थेच्या सचिव पदी कार्यरत आहे त्यांची आणखी नवी ओळख म्हणजे कवयीत्री, लेखिका, साहित्यीक व सामाजिक बांधिलकी जपत आगामी काळात खुप सुंदर विषयावर कविता सादर करून कवी रसिकांची मने जिंकली, सौ. राणी वसंत धनवे यांना नुकताच युवा प्रबोधन साहित्य मंच, वडगाव मावळ, पुणे तर्फे राज्यस्तरीय आदर्श मावळ युवा नारीशक्ती पुरस्काराने गौरविण्यात आले आहे त्या कुटुंबवत्सल गृहिणी असून त्यांनी लॉकडाऊनच्या काळात साहित्य क्षेत्रात देखील आपला ठसा प्रामाणिकपणे उमटविला आहे, अनेक राजस्तरीय, जिल्हास्तरीय, विविध काव्यसंमेलनात सहभाग घेऊन त्यांना साहित्य क्षेत्रातील सामाजिक क्षेत्रातील विविध उपक्रम आणि अनेक पुरस्कार त्यांना प्राप्त झाले आहेत. वसुंधरा सोशल फौंडेशनचे संस्थापक आय आय फराश सर आपल्या भाषणात सांगितले की या संस्थेने खूप कमी वेळात बरेच कार्यक्रम खूप सफलपणे आयोजित केले आहेत आणि प्रत्येक कार्यक्रमांमध्ये लांबून लांबून कवी आणि साहित्यकार यांना आमंत्रित करून त्यांची सर्व प्रकारे सेवा केली आहे. या संस्थेद्वारे प्रत्येक वेळी कमीत कमी ४० साहित्यकार आणि समाजसेवकांना पुणेरी पगडी, प्रशस्तीपत्र, स्मृतिचिन्ह, देऊन वसुंधरा गौरव पुरस्काराने सन्मानित केले आहे. तसेच नवोदित कवी यांना नवनवीन कविता लिहिण्यासाठी प्रोत्साहित केले आहे. नवोदित कवींना व्यवस्थित मार्गदर्शनासाठी ही संस्था प्रत्येक वेळी ज्येष्ठ कवींना आमंत्रित करते त्यामुळे नवोदित कवींना त्यांना ऐकता येईल आणि मंचावर कविता कशी प्रस्तुत करावी याचे मार्गदर्शन मिळेल. या कार्यक्रमांमध्ये वधु वर सूचक मेळावा पण घेतला गेला. यामध्ये उपस्थीत सर्व महिलांनी सहभाग घेतला आणि वेगवेगळ्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्या बद्दल वसुंधरा गौरव पुरस्काराने सन्मानीत केले प्रस्तुत कार्यक्रमाचे सुत्र संचालन ॲड. उमाकांत आदमाने, पुणे यांनी खुप बहारदार केले आणि कार्याक्रमास एक वेगळी रंगत आणली तसेच या पुरस्कार सोहळ्यात आलेल्या पाहुण्यांचे आभार प्रदर्शन मा. आय.आय. फराश सरांनी केले.

# राज्य उत्पादन शुल्क विभागाची ठाण्यात सर्वात मोठी कारवाई, आरोपींमध्ये महिलेचाही समावेश, दीड कोटींचा मद्यसाठा जप्त

**( प्रतिनिधी )**

निवडणूक काळात कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही याची खबरदारी घेण्याची सूचना सर्वच आस्थापनाना प्रशासनाने दिली आहे. या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क विभागाने आपल्या सर्व विभागांना सतर्क राहण्यास सांगितले आहे. आचारसंहिता लागू झाल्यापासून राज्य उत्पादन शुल्क ठाणे विभागही ॲक्शन मोडवर आला आहे. १६ मार्च ते २४ एप्रिल या कालावधीत ठाणे विभागात अवैध मद्य निर्मिती, तस्करी, विक्री, वाहतूक अशा प्रकारच्या ३११ गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे. यापैकी १८८ गुन्ह्यांची उकल करण्यात आली असून, विभागाने केलेल्या कारवाईत १ कोटी ५६ लाख ८४० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

या गुन्ह्यांमधून आत्तापर्यंत 190 आरोपींना अटक केली आहे. तर कारवाईत 9 वाहने जप्त केली आहेत. विशेष म्हणजे आरोपींमध्ये एका महिलेचाही समावेश आहे. तसेच आगामी लोकसभा निवडणूक 2024 च्या अनुषंगाने जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात अवैध मद्य निर्मिती, वाहतूक आणि विक्री तसेच परराज्यातील मद्य, अवैध ताडी आदींची विक्री, अवैध ढाब्यांवर मद्याची विक्री होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे राज्य उत्पादन शुल्क ठाणे विभागही सक्रिय झाला आहे.

राज्य उत्पादन शुल्काकडून कडक कारवाई

राज्य उत्पादन शुल्क विभागाने 2 नियमित आणि विशेष भरारी पथके तयार केली आहेत. ठिकठिकाणी तपासणी नाके उभारण्यात येऊन संशयित वाहनांची तपासणी करण्यात येत आहे. तसेच रात्रीची गस्त घालण्यात येत आहे. राज्याचा महसूल चुकवून परराज्यातून येणाऱ्या मद्य साठ्यावर तसेच किरकोळ अनुज्ञप्तीचे व्यवहार विहीत वेळत चालू नसल्यास आणि काहीही आक्षेपार्ह आढळून आल्यास कठोर कारवाई




करण्यात येणार आहे. ही कामगिरी राज्य उत्पादन शुल्क ठाणे विभागाचे अधीक्षक डॉ. निलेश सांगडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे. तर निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अवैध मद्य निर्मिती, तस्करी, वाहतूक आणि

# मममनिजामकालीन खजाना विहिरीला दुष्काळाच्या झळा ; पाण्याने तळ गाठला ; संरक्षण व संवर्धनाची गरज :- डॉ.गणेश ढवळे

बीड:- कमी पावसामुळे घटत जाणा-या भुजल पातळीचा परीणाम विहिरी,धरणे,साठवण तलावा बरोबरच प्राचीन काळातील जलतंत्रज्ञानावर झाला असुन बीड जिल्ह्याला मागील ४-५ वर्षांपासून सतत कमी पर्जन्यमानामुळे दुष्काळाच्या झळा बसत असतानाच बीड शहराचे वैभव असणा-या खजाना विहिरीला दुष्काळाची झळ बसली असुन पाण्याची पातळी कमी होऊन तळ गाठला आहे. विहिरीच्या संरक्षण आणि संवर्धनाची आवश्यकता असुन गाळ काढुन विहीरीच्या सिंचन क्षमतेत वाढ होऊन विहीरीच्या सौंदर्यात भर पडणार असल्याने प्रशासनाने लक्ष द्यावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

सविस्तर माहितीस्तवबीड शहराच्या दक्षिणेस ५ किलोमीटर अंतरावर १५७२ च्या सुमारास निजामकालीन शास्त्रीय दृष्टिकोनातून स्थापत्य कलेचा जलस्त्रोतापैकी अतिशय उत्तम नमुना असलेली विहीर बांधण्यात आली. विहिरीचा व्यास सुमारे ५० फुट असुन खोली २३.५ मीटर आहे.जमिनीपासुन १७ फुट अंतरावर असलेल्या विहिरीला गोलाकार ओरंडा असुन ओसरी खाली ६ फुट विहीर आहे.बीड शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी विहीरीमध्ये कालवा बांधलेला आहे.या कालव्याद्वारे बीड शहरातील बलगुजर भागातील ४५० एकर शेती कुठल्याही उपकरणाशिवाय सिंचनाखाली आहे. विहिरीला ३ कालवे आहेत.यातील एक नैऋत्य,दुसरा अग्नेय तर तिसरा उत्तर दिशेला.कधीही न आटणा-या खजाना विहीरीच्या बांधकामासाठी चुना आणि दगडांचा वापर केलेला






असुन मध्ययुगीन काळात या परिसरातील गोळा होणारा पैसा राजाला न देता विहिरीच्या बांधकामासाठी खर्च केल्याने या विहिरीला खजाना विहीर असे नाव पडले आहे.

विहिरीच्या संरक्षण व संवर्धनाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष ; गाळ काढण्याची आवश्यकता:- डॉ.गणेश ढवळे

बीड शहराच्या वैभवात भर घालणारी बीड शहरालगत असणा-या खजाना विहीरीच्या संवर्धनासाठी विशेष प्रयत्न करणं गरजेचं असताना संवर्धनाची जबाबदारी असणाऱ्या पाटबंधारे विभागाचे मात्र याकडे दुर्लक्ष होत असुन या विहिरीतील गाळ काढणे आवश्यक आहे.विविध सामाजिक संघटना, इतिहास प्रेमी यांच्याकडून अधुनमधून विहिरीची स्वच्छता करण्यात येते मात्र पाटबंधारे विभागाने यातील गाळ काढणे आवश्यक आहे त्यातुन विहिरीच्या सिंचन क्षमतेत वाढ होऊन विहिरीच्या सौंदर्यात भर पडणार आहे. त्यामुळे विहिरींचे संरक्षण आणि संवर्धन होणे गरजेचे आहे.



आराध्याचा मांहेंद्र मोरे हिचा वाढदिवस बीड येथील वृध्दा आश्रम/ अनाथ आश्रम स्नेह सावली या ठिकाणी ब्लॅन्केट/ शालेय साहित्य तसेच खाऊ वाटप करून ज्या अजी आजोबांन ला नांतवान सोबत खेळायचे बागडायचे दिवस असतात त्यांना ही या क्षणांचा आनंद मिळावा तेथील मुलांनला ही यात सहभागी करून आम्ही सर्व कुटंबानी त्या ठिकाणी मोठ्या आनंदाने वाढदिवस साजरा केला तेथील आजी आजोबांनी मुलांनी आराध्याला भरभरून शुभेच्छा दिल्या ज्यानला खरी आनंदाची गरज आहे आशा लोकात वाढदिवस साजरा केला...

# 39 बीड लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निरीक्षक नियुक्त

बीड, दि. 24: 39 बीड लोकसभा मतदारसंघांचे निवडणूक निरीक्षक (Genral Election Observer) भारतीय प्रशासकीय सेवेतील अजिमुल हक हे नियुक्त करण्यात आले आहेत. श्री हक हे भारतीय प्रशासकीय सेवेतील दिल्ली कॅडरचे अधिकारी आहेत. ते आज (गुरुवार) पासून बीडच्या दौऱ्यावर आहेत.त्यांचा संपर्क क्रमांक 9404592511 हा आहे. ते शासकीय विश्रामगृहात थांबणार असुन त्यांचे संपर्क अधिकारी म्हणून जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी ज्ञानेश मोकाटे आहेत. राजस्थान कॅडरचे पोलीस उप महानिरीक्षक, योगेश यादव, हे ३९ बीड लोकसभा मतदारसंघासाठी कायदा व सुव्यवस्था निरीक्षक म्हणुन नियुक्त करण्यात आले आहेत. त्यांचे वास्तव्य 'बिंदुसरा ' या पोलिस विभागाच्या विश्रामगृहावर असणार आहे. त्यांचा संपर्क क्रमांक 9403635611 हा आहे. त्यांचे संपर्क अधिकारी म्हणून पोलीस उपनिरीक्षक, संजय तुपे हे असणार आहेत.

# डॉ. सीमा जगताप यांनी आज बीड जिल्ह्यात निवडणुकीच्या अनुषंगाने तयार केलेल्या विविध कक्षांना भेट दिली.

बीड, दि. 24 : बीडमधील माध्यम संनियंत्रण व प्रमाणीकरण समिती(एमसीएमसी) आणि मीडिया कक्षाचे काम महिला अधिकारी तसेच कर्मचारी समर्थपणे पेलत आहेत, ही कौतुकास्पद असल्याची प्रशंसा सहाय्यक आयुक्त (विकास नियोजन ) डॉ.सीमा जगताप यांनी मंगळवारी सायंकाळी भेट देते वेळी केली. डॉ. सीमा जगताप यांनी आज बीड जिल्ह्यात निवडणुकीच्या अनुषंगाने तयार केलेल्या विविध कक्षांना भेट दिली. यावेळी त्यांनी एमसीएमसी व मीडिया कक्षाला ही भेट दिली. त्यावेळी त्या म्हणाल्या, निवडणुकीत माध्यमांचे काम अधिक जिकरीचे असते हे काम बीडमध्ये महिला अधिकारी व कर्मचारी करीत असल्याचे पाहून आनंद झाला असे ते यावेळी म्हणाल्या.

मीडिया कक्ष प्रमुख अंजू निमसरकर यांनी सहाय्यक आयुक्त जगताप यांना कक्षाची रचना तसेच मीडिया कक्षाचे दैनंदिन कामाची माहिती दिली. दैनिक वर्तमान पत्राच्या माध्यमातून प्रकाशित होणाऱ्या बातम्यांचा अहवाल निवडणूक आयोग माहिती जनसंपर्क महासंचनालय



तसेच जिल्हा निवडणूक अधिकारी यांना दररोज दिला जात असल्याचे सांगितले. यासह पेड न्यूज बातम्यांवर या पक्षाची करडी नजर असते असेही सांगितले. तसेच विविध चॅनल्स प्रसारित करत असलेल्या राजकीय पेड जाहिरातीवरही निरीक्षण करत असल्याचे सांगितले. या कक्षात बहुसंख्य महिला असून अतिशय कार्यक्षमपणे त्या काम करीत असल्याचे कौतुकही श्रीमती जगताप यांनी यावेळी केले. यावेळी मीडिया कक्षाच्या प्रमुख अंजू निमसरकर यांच्यासह राजश्री आचार्य, प्रतिभा खाडे, छाया जिरे तसेच लता कारंडे या उपस्थित होत्या.

# ३९ बीड लोकसभा मतदारसंघ निवडणूक सहाव्या दिवशी २९ उमेदवारी अर्ज दाखल आजपर्यंत एकूण ४४ उमेदवारी अर्ज दाखल

बीड, दि.24 : 39 बीड लोकसभा मतदारसंघामध्ये आज सहाव्या दिवशी 29 नामनिर्देशन अर्ज दाखल झाली असून आजपर्यंत एकूण 44 उमेदवारी अर्ज दाखल केली आहेत.

39 बीड लोकसभा मतदारसंघातून आज 29 उमेदवारीअर्ज दाखल केले आहेत. यामध्ये कोळेकर गणेश भाऊसाहेब (अपक्ष), करूणा मुंडे(स्वराज्य शक्ती सेना), हिदायत सादेख अली सय्यद (अपक्ष),अंबादास जाधव (अपक्ष), सादेक हुसेन महम्मद (अपक्ष), संतोष उत्त्म रासवे (अपक्ष), सलाउद्दीन खान पठाण (अपक्ष),गणेश व्यंकटराव कस्पटे (अपक्ष), सादेक इब्राहीम शेख (अपक्ष), अशोक सुखदेव हिंगे (वंचित बहुजन आघाडी), पंकजा गोपीनाथराव मुंडे (भारतीय जनता पक्ष) यांनी चार अर्ज दाखल केले, प्रितम गोपीनाथराव मुंडे (भारतीय जनता पक्ष) यांनी दोन अर्ज दाखल केले, श्रीराम विठ्ठलराव खळगे (अपक्ष), मुस्तफा मैनोदीन शेख(अपक्ष), सुलेमान खैरोद्दीन महमद (अपक्ष),भिमराव जगन्नाथ दळे (अपक्ष),रहेमान बाहोद्दीन सय्यद (अपक्ष), राजेंद्र अच्युतराव होके(अपक्ष), जावेद सिकंदर मोमीन (अपक्ष), लक्ष्मीबाई बाजीराव मोरे (अपक्ष), रविकांत अंबादास राठोड (अपक्ष), देविदास यशवंत शिंदे (अपक्ष), पठाण अमजद जिलानी (अपक्ष), पठाण सरफराज बाबखाँ(अपक्ष), जावेद सलीम सय्यद (टिपू सुलतान पार्टी) असे एकूण 29 नामनिर्देशन अर्ज जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांच्या समक्ष सादर केले आहेत. आज पर्यंत एकूण 117 इच्छुक उमेदवारांना 262 नामनिर्देशन पत्रांचे वाटप करण्यात आले आहे. 39 बीड लोकसभा



मतदारसंघासाठी दि. 18 एप्रिल 2024 रोजी अधिसूचना जारी करण्यात आली असून 25 एप्रिल 2024 ही उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख आहे. तर 26 एप्रिल 2024 रोजी उमेदवारी अर्जांची छाननी करण्यात येणार आहे. 29 एप्रिल 2024 ही अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख आहे. सोमवार दि. 13 मे 2024 रोजी मतदान होणार आहे. तर 4 जून रोजी मतमोजणी केली जाईल. निवडणूक आदर्श आचारसंहिता 6 जूनपर्यंत राहील.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
गुरुवार २५ एप्रिल २०२४ पान क्रं - ४ PAGE NO 4



भारतरत्न. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती राक्षसभुवन यांच्या वतीने विनोद दादा हातागळे यांना निमंत्रण देताना समिती अध्यक्ष उपाध्यक्ष व सर्व समिती पदाधिकारी गावकरी व मित्रपरिवार उपस्थित होते...

# निवडणूक काळात मराठा तरुणांवर तडीपारची कारवाई करणे निंदनीय व चुकीचे

## निवडणूक आयोगाकडे दाद मागणार - बजरंग सोनवणे

माजलगाव: मराठा चळवळीमध्ये काम करणाऱ्या ज्या एका समूहाच्या तरुणांवर त्यांचे कोणतेही गुन्हेगारीचे रेकॉर्ड नसताना तडीपारची कारवाई केली जाते. हे निंदनीय व चुकीचे असून निवडणुक काळात अशा प्रकारची यापुढे कारवाई करू नये, जी कारवाई केली, ती थांबविली पाहिजे. या संदर्भात निवडणूक आयोगाकडे तक्रार करून दाद मागणार असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे व इंडिया



आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी बाभळगाव घाट (ता. माजलगाव)

येथे प्रचारादरम्यान बोलताना दिली. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे हे प्रचारासाठी माजलगाव तालुक्यात फिरत आहेत. तालुक्यातील बाभळगाव घाट येथे बोलताना बजरंग सोनवणे म्हणाले की, बीड जिल्ह्यातील मराठा समाजाच्या २७ तरुणांवर त्यांनी मराठा आंदोलनात सहभाग घेतला. म्हणून जिल्हा प्रशासनाने तडीपारची कारवाई केली आहे. शासनाने आकस बुद्धीने आणि मराठा समाजाविषयी आकस म्हणून त्यांच्यावर तडीपारची कारवाई केलेली आहे. असा आरोप करीत निवडणुकीत दहशतीचे वातावरण करणे, या गोरगरीब तरुणांच्या घरावर दबाव देणे ही राजनीती तर नाही ना ? असा संशय व्यक्त करीत हे कोण करतंय, का करायला लावतंय असे प्रश्न उपस्थित केले. महाराष्ट्रात असे हजारो लोक आहेत, की ज्यांच्यावर अनेक गुन्हे असताना त्यांच्यावर तडीपारची कारवाई होत नाही. आमच्या या तरुणांवर का कारवाई केली जाते. यांच्यावर कोण दबाव टाकतय याची तक्रार निवडणूक आयोगाकडे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे व इंडिया आघाडीचा उमेदवार म्हणून करणार असून दाद मागणार असल्याचे त्यांनी सांगितले. तर कारवाई झालेल्या तरुणांच्या पाठीशी उभा असून प्रसंगी वेळ पडली तर न्यायालयात देखील जाऊ अशी ग्वाही ही बजरंग सोनवणे यांनी दिली.

## सहाय्यक आयुक्त यांची विविध निवडणुक कक्षांना भेट

बीड, दि. 24: छत्रपती संभाजी नगर येथील विभागीय आयुक्तच्यांवतीने सहाय्यक आयुक्त (विकास नियोजन) डॉ. सीमा जगताप यांनी बीड जिल्ह्याच्या निवडणुकीविषयी विविध कक्षांना मंगळवारी सायंकाळी भेटी दिल्या. छत्रपती संभाजी नगर विभागीय आयुक्त यांच्या प्रतिनिधी म्हणून डॉक्टर सीमा जगताप यांचा बीड जिल्ह्यात दौरा होता. यावेळी त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात निवडणुकीविषयी कामकाज करणाऱ्या विविध कक्षांना भेटी दिल्या. अपर जिल्हाधिकारी श्री कुलकर्णी यांची भेट घेतली डॉ. जगताप यांनी अपर जिल्हाधिकारी डॉ. त्रिगुण कुलकर्णी त्यांच्या कक्षात भेट घेतली. यावेळी त्यांनी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 अंतर्गत 39 बीड लोकसभा मतदार संघातील ईव्हीएम-व्हीव्हीपॅट कक्ष जो अपर जिल्हाधिकारी नियंत्रित करीत आहेत त्याची माहिती जाणून घेतली. बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट, व्हीव्हीपॅटची सरमिसळ झालेली असुन



सहा विधानसभा मतदार संघाच्या स्ट्राँग रुम मध्ये पोहचविण्यात आले असल्याची माहिती श्री कुलकर्णी यांनी यावेळी दिली. उपजिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या कक्षाला भेट उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्र कुमार कांबळे यांच्या कक्षाला डॉ. जगताप यांनी भेट देऊन निवडणुकी विषयक आतापर्यंत झालेल्या कामकाजाची माहिती जाणून घेतली. याप्रसंगी श्री कांबळे यांनी डॉ. जगताप यांना 2024 ची संदर्भिका दिली. उपजिल्हाधिकारी श्री सूर्यवंशी यांच्याकडून जाणून घेतले टपाली मतदान प्रक्रिया उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी यांच्याकडून टपाली मतदानांतर्गत होणारे विविध वर्गातील मतदानाची प्रक्रिया सीमा जगताप यांनी त्यांच्या कक्षात जाऊन माहिती जाणून घेतली. एकही मतदाता सुटता कामा नये यासाठी 39 बीड लोकसभा मतदार संघ सज्ज आहे. सर्व्हिस , दिव्यांग, वृद्ध, निवडणुकीसाठी विविध सेवेत रुजू असणारे मतदार या सर्वांची काळजी भारतीय निवडणूक आयोगाने घेतली असून प्रत्येकांचे मतदान व्हावे यासाठी जिल्हा निवडणुक अधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांच्या मार्गदर्शनात प्रयत्न सुरू असल्याचे सूर्यवंशी यांनी यावेळी सांगितले.

### दिव्यांगांना सुगम्य सुविधासह अन्य बाबींसाठी सहाय्यक आयुक्त डॉक्टर जगताप यांच्या मतदान केंद्रांना भेटी



बीड, दि: 24(जीमाका) 39 बीड लोकसभा मतदारसंघात दिव्यांग मतदारांना सुगम्य सुविधा, तसेच मतदान केंद्रावर अन्य सुविधा असाव्यात यासाठी छत्रपती संभाजी नगर येथील आयुक्त कार्यालयाच्यावतीने सहाय्यक आयुक्त (विकास नियोजन) डॉक्टर सीमा जगताप यांनी मंगळवारी दौरा केला. सहाय्यक आयुक्त डॉक्टर जगताप यांनी माजलगाव, बीड, व गेवराई या तीन विधानसभा मतदारसंघातील विविध मतदान केंद्रांचा पाहणी दौरा करून आढावा घेतला. या ठिकाणी दिव्यांगांना सुगम्य सुविधा आहेत का याची पाहणी केली यासह मतदान केंद्रावर आवश्यक सुविधांची पाहणी केली. माजलगाव येथील दौऱ्या दरम्यान तहसीलदार वर्षा मनाळे या त्यांच्यासोबत होत्या. बीड तसेच गेवराई मतदान केंद्रात भेटी देऊन त्यांनी या ठिकाणी आवश्यक सोयी सुविधांची पाहणी केली. यावेळी नायब तहसीलदार सुहास हजारे त्यांच्यासोबत होते. माजलगाव, बीड, गेवराई येथील मतदान केंद्राची पाहणी केल्यानंतर डॉक्टर सीमा जगताप यांनी समाधान व्यक्त केले.

# माजी जि.प. सदस्य नारायण बाप्पा शिंदे समर्थकांचा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार साहेबांच्या पक्षात प्रवेश

## प्रवेश करून लोकसभा उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांना जाहीर पाठिंबा दिला

नेकनूर / प्रतिनिधी

बीड लोकसभेचे बिगुल वाजले आहे आणि महाविकास आघाडी कडून बीड लोकसभेसाठी बजरंग सोनवणे हे निवडणूक लढणार आहेत यासाठी त्यांना जिल्ह्यातून वेगवेगळ्या ठिकाणाहून पाठिंबा मिळताना पाहायला मिळत आहे तसेच अनेकांचे शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये प्रवेश होताना पाहायला मिळत आहेत यातच नेकनूर येथील ग्रामपंचायत सदस्य सय्यद साजेद अली इजराइद्दीन जहागीरदार यांनी आज त्यांचा प्रवेश राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाचे जयंत पाटील



साहेब मेहबूब शेख आमदार संदीप क्षीरसागर आणि काँग्रेसच्या माजी खासदार रजनीताई पाटील यांच्या उपस्थितीमध्ये राष्ट्रवादी भवन बीड येथे प्रवेश करण्यात आला आहे. सय्यद साजिद अली हे गेल्या काही वर्षांपासून राष्ट्रवादी बरोबर होते पक्षांमध्ये उभी फूट पडल्यानंतर त्यांनी माजी जिल्हा परिषद सदस्य नारायण बप्पा शिंदे यांच्याबरोबर अजित पवार गटामध्ये गेले काही दिवस नाराज असल्याचे जाणवल्यानंतर त्यांनी बजरंग सोनवणे यांना मोठ्या संख्येने मताधिक्य मिळवून देण्यासाठी शरदचंद्र पवार गटामध्ये आज प्रवेश केला आहे

### नेमकं काय म्हणाले आपण पाहुया..

प्रवेश नेकनूर पंचायत समिती सदस्य अनिल जाधव, रशीद मामा मोहिब भाई ,संजय शिंदे अरविंद जाधव, बाबा सर बीएसएनएल, रशीद भाई,जहांगीर सर, नौशाद भाई,साहेब, यासीन नेते, शफिक भाई, फहमी भाई, मुदस्सर,बाबूल सर,(बाबूल)सय्यद आहाद, संतोष पवार,आरेशाद, नेकनूर तालुक्यात इतर मान्यवर उपस्थित होत,

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com